# लेण्याद्रीचा श्री गिरिजात्मज

लेण्याद्रीच्या कडेकपारी | गिरिजात्मज हा वास करी |
मातेसाठी मिरीक्रूहरी | पार्थिव देवत्व पावले ||



## श्री क्षेत्र लेण्याद्री :

जुन्नर तालुक्यातील जुन्नर लेण्यांच्या समुदायात आणि कुकडी नदीच्या परिसरात लेण्याद्री डोंगरावर श्री गिरिजात्मक गणेशाचे हे स्वयंभू स्थान आहे. ज्या डोंगरावर लेणी कोरलेली आहेत असा डोंगर म्हणजे लेण्याद्री व त्यापैकी एका लेण्यात या गणपतीची स्थापना झालेली आहे. लेण्याद्रीचा श्री गिरिजात्मक हा जुन्नरपासून ७ कि.मी. अंतरावर आहे, तर पुण्यापासून सुमारे ९७ कि.मी. अंतरावर हे ठिकाण आहे.

# गिरिजात्मजाचे देवालय :

लेण्याद्रीचा श्री गिरिजात्मज हा अष्टविनायकांपैकी सहावा गणपती. अष्टविनायकांपैकी लेण्याद्रीव्यतिरिक्त इतर सात गणपतींना निरनिराळया वास्तुशैलीतील मंदिरांचे कोंदण लाभले आहे. लेण्याद्रीचा गणपती मात्र थंड काळया पाषाणातील गुहेमध्ये विराजमान आहे.

जुन्नरेच्या उत्तरेस कुकडी नदीच्या पलीकडे ‘लेण्याद्री’ या डोंगरावर हे देवालय कोरुन काढलेले आहे. या देवास्थानाला ‘गणेशलेणी’ असेही म्हणतात. मंदिरात जाण्यासाठी डोंगरावर सुमारे ४०० पायऱ्या आहेत. सभोवताली सर्वत्र खोदकाम असून लेणी फारच सुंदर आहेत. या देवस्थानच्या पूर्वेस व पश्चिमेस एकूण २८ लेणी आहेत. एकाच मोठया आकाराच्या शिळेत ही लेणी कोरलेली असून मंदीर सातव्या शिळेत आहे. देवासमोरच्या ५१ X ५७ फुट अशा विस्तीर्ण सभामंडपात दर्शणी दिसणारे कोरलेले सहा दगडी खांब आहेत. मुख्य गाभारा बराचसा आतल्या बाजूला असून तिथे बराच अंधार आहे. या मंदिरात लाईट नाहीत. ज्या काळात हे मंदिर बांधले गेले त्या काळात त्याची रचनाच अशी होती की या मूर्तीवरच सरळ सूर्यकिरणे येतात. देवालयाच्या दोन्ही बाजूंना मिळून १७-१८ कोरुन काढलेल्या ओवऱ्या आहेत. देवासमोरच्या भव्य मंडपात संगमरवरी फरशी आहे. खुद्द देवालयातील सभामंडपाची ऊंची फारशी नाही. सभामंडपाच्या पुढे गेले की आठ कोरीव खांब व त्यावर वरच्या बाजूला गाय, वाघ, सिंह, हत्ती असे सुंदर नक्षीकाम केलेले मुखवटे कोरलेले आहेत. पायऱ्या उतरुन खाली गेले की एक प्रचंड बौद्ध स्तूप लागतो. त्याला लोक ‘भिमाची गदा’ असे म्हणतात, कारण त्याचा आकार उभ्या केलेल्या प्रचंड गदेसारखा आहे. याही ठिकाणी वाघ, सिंह, हत्ती असे मुखवटे कोरलेले आहेत. याच परिसरात सुमारे २० दगडी खांब सुबक गोलाईचे आहेत. त्या खांबांच्या सर्वात खाली चौकोनी यज्ञकुंडाच्या आकाराची बैठक आहे. त्यावर गोलाकार तक्तपोशी आहे. पेशवे काळात या मंदिराचा जिर्णोद्धार झाला होता.





## नैमित्तीक उत्सव :

येथील मोठा उत्सव भाद्रपद व माघ शुद्ध चतुर्थीला होतो. हा देवतेचा जन्मोत्सव, कीर्तन, सहस्त्रावर्तन, महापूजा इत्यादींना साजरा केला जातो.

## पौराणिक कथा :

हिमालय पर्वताची मुलगी पार्वती हिने आपल्याला गजानन पुत्र व्हावा या इच्छेने लेण्याद्रि पर्वताच्या गुहेत १२ वर्षे तपश्चर्या केली. आपले मन एकाग्र व्हावे म्हणून तिने मातीची जी बालमूर्ती बनविली होती त्यातूनच तिच्या भक्तीला वश होऊन श्री गजानन बाल होऊन प्रकट झाले. तुझ्या इच्छेप्रमाणे मी तुझा पुत्र होईन. तुझे व लोकांचे मनोरथ पूर्ण करीन, असा त्याने पार्वतीला वर दिला. भाद्रपद चतुर्थीला पार्वतीने गजाननाच्या पार्थिव मूर्तीची पूजा केली. ती मूर्ती सचेतन होऊन पार्वतीपुढे पुत्र रुपाने प्रकट झाली. त्या बालकाला सहा हात, तीन नेत्र व सुंदर शरीर होते. दिव्य तेजस्वी असा असा गजानन तिच्या पुढे आला परंतु, पार्वती आपल्या चिंतनात मग्न होती. त्याने तिला जागे केले. पार्वती धन्य झाली. पार्वती म्हणजे गिरीजा व गिरिजेचा हा आत्मज – पुत्र म्हणजे गिरिजात्मज.

श्रीगणेशाच्या सर्व बाललिला याच डोंगराच्या परिसरात झाल्या. गिरिजात्मज गणेशाने १२ वर्षे या क्षेत्रात तप केले. अत्यंत बाल्यावस्थेतच मोठमोठ्या दैत्यांचा संहार केला व सर्वांची जाचातून सुटका केली. याच प्रदेशात गौतममुनींनी गणेशाची मुंज केली. याच प्रदेशात मयूर हा गणेशाचे वाहन झाला व म्हणून गणेशास 'मयुरेश्वर' असेही म्हणतात. गिरिजात्मज गणेशाने या प्रदेशात सुमारे १५ वर्षे वास्तव्य केले होते. त्यामुळे हे क्षेत्र अत्यंत पवित्र मानले जाते.

श्री गजानन प्रकट झाले ती जागा अतिशय अवघड असल्यामुळे त्या ठिकाणी जाऊन गणपतीचे दर्शन घेण्याचे काम महाकर्म कठीण ठरते. एकदा नाना फडणविसांनी त्या बिकट जागेवर असलेल्या गणपतीचे दर्शन घेण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यांना दृष्टांत झाला आणि त्यामुळे तो आपला प्रयत्न त्यांना सोडून द्यावा लागला.